# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोननं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- १२०-२३** **दिनांक :- १२/०४/२०२३**

## वर्क फ्रॉम होमच्या नावाने होणा-या फसवणूकी संदर्भात नागरिकांनी दक्षता घेण्याबाबत आयुक्तालयाचे वतीने आव्हान.

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात इंटरनेटचा वापरात मोठया प्रमाणात वाढ झाली असुन त्याच प्रमाणामध्ये सायबर गुन्हयांची संख्याही वाढली आहे. सायबर गुन्हेगार लोकांना वेगवेगळया मार्गाने गंडा घालण्याचा प्रयत्न करतात. ज्यांना सायबर सुरक्षेबाबत कल्पना असते ते यामधून वाचतात. मात्र बहुतांश लोक सायबर गुन्हेगारांच्या जाळयात सहज अडकले जातात. सध्या घरी बसल्या बसल्या सोशल मिडीयावर त्याला काही तासांमध्ये घरुन काम करुन पैसे कमवा अशी जाहिरात करुन लिंक पाठविण्यात येते. त्याद्वारे चॅट बॉक्स ओपन झाल्यानंतर वेबसाईटची लिंक पाठवून त्यात स्वतःच्या नावाचे नोंदणी करण्यास सांगून सुरवातीला पैसे पाठवून विश्वास संपादन करुन कमीशन च्या नावाने पैसे पाठविण्यास सांगून फसवणूक करण्यात येते. तसेच वेगवेगळया टास्क मध्ये रिव्हयु करा, टॅग करा, लाईक्स करा असे करुन तुम्हाला १०,०००/- रुपये मिळतील. परंतू त्याकरीता तुम्हाला पॅकेज घेतल्यानंतर मोठ-मोठया रक्कमेचे आमिष दाखवून फसवणूक करण्यात येते.

*तरी सायबर गुन्हे कक्ष ,मि.भा.व.वि. यांचेकडून नागरिकांना जाहिर आवाहन करण्यात येते की,*

**१. अनोळखी नंबरवरुन आलेल्या एसएमएस लिंकवर क्लिक करु नये.**
**२. आपली गोपनीय माहिती वेबसाईटवर भरण्यापुर्वी नमुद वेबसाईटचा यु.आर.एल. काळजीपुर्वक तपासा.**
**३. बँकेच्या कार्ड तपशील, पिन, ओ.टी.पी., पासवर्ड इत्यादी वैयक्तिक किंवा आर्थिक माहिती कोणासोबत शेअर करु नका.**
**४. लिंकवर क्लिक करण्यापुर्वी आधी विचार करा.**
**५. टेलीग्राम मध्ये येणा-या फसव्या लिंक्सवर क्लिक करु नये.**
**६. नामांकीत कंपन्यांमध्ये वर्क फ्रॉम होमव्दारे पैसे कमावण्याचे आमिषाला बळी पडू नका. (अमॅझोन, फ्लिपकार्ट, नोकरी.कॉम इ.)**

तरी मिरा-भाईंदर, वसई-विरार शहरातील नागरिकांना सायबर गुन्हे कक्ष, मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातर्फे जाहिर आवाहन करण्यात येत की, अशा प्रकारे होणा-या फसवणूकीबाबत सतर्क रहावे. तसेच अशा प्रकारे कोणत्याही इसमाची फसवणूक झाल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच **www.cybercrime.gov.in** अथवा **1930** या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.

-----ooooo----